# <u>जाहिरात</u>

## आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई कार्यालयांतर्गत सरळसेवा सहायक गुप्तवार्ता अधिकारी भरती -२०१८

जाहिरात क्रमांक : ०१ /२०१८.    **ठिकाण,मुंबई**    **दिनांक २५/ ०५/२०१८**

१. राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई या विभागात सरळसेवेने सहायक गुप्तवार्ता अधिकारी, गट-क या संवर्गाची रिक्त पदे वहित शैक्षणीक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधून भरण्यासाठी **प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in व www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर (वेब साईट ) जाहिरात तसेच माहिती पत्रक व भरतीची सविस्तर माहिती उपलब्ध राहील.**

२. **<u>उपलब्ध पदसंख्या</u> :-**

| सामाजिक आरक्षण | पदाचे नाव | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकुण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रागुवि | स.गु.अ. | २४ | १६ | ०८ | ०५ | ०८ | ०३ | ०५ | ३२ | ९३ | १९४ |
| नविअ, नक्षल वर्ग केलेले पद | स.गु.अ. | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०५ | १० |
| एकूण | | २५ | १७ | ०९ | ०५ | ०८ | ०३ | ०५ | ३४ | ९८ | २०४ |

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व त्याप्रमाणे आरक्षणात बदल होण्याची शक्यता असू शकते. बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका-यास राहतील.

३. **शैक्षणिक अर्हता**

३.१ उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा. महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेली पदवी स्विकाराहं असेल

४.

| शारिरिक पात्रता | महिलांकरिता | पुरुषांकरिता |
|---|---|---|
| उंची | किमान १५५ से.मि.(अनवाणी) | किमान १६५ से.मि.(अनवाणी) |
| छाती | | न फुगवता ७९ से.मि.पेक्षा कमी नसावी व न फुगविलेली छाती व फुगविलेली छाती यातील फरक ५ सें.मि.पेक्षा कमी नसावा. |

५. वयोमर्यादा :- दि.१२/०६/२०१८ रोजी अमागास (खुला) उमेदवारांकरीता वय ३० वर्ष व मागास उमेदवारांकरीता वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे

५.१ माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / अंशकालीन कर्मचारी यांच्या वयाची परिगणना शासन निर्णयानुसार करण्यात येईल

६. शुल्क :-

६.१ अमागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता **रु.५२५/-** व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता **रु.३२५/-** शुल्क भरणे **आवश्यक आहे** माजी सैनिक उमेदवारांकरिता रु.**१००/-**

७. सेवा प्रवेशाबाबत बंधपत्र :- शासन निर्णयान्वये सहायक गुप्तवार्ता अधिकारी पदावर निवड केलेल्या उमेदवारांकडून ३ वर्षाकरिता खालील प्रमाणे बंधपत्र ( **बॉन्ड / हमीपत्र** ) घेण्यात येईल.

" सहायक गुप्तवार्ता अधिकारी या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात सहायक गुप्तवार्ता अधिकारी या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा शासनास योग्य वाटेल अशा कारणांव्यतिरिक्त सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर तसेच परिविक्षाधीन व्यावसायिक प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च आणि प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासहीत संबंधित उमेदवारांकडून वसूल करण्यात येईल. अशा **प्रकारचे बंधपत्र** (बॉन्ड / हमीपत्र ) संबंधित उमेदवारांकडून घेण्यात येईल. "

८ उपरोक्त पदासाठीची ऑनलाईन स्वरुपातील चाचणी / परिक्षा पदवी समकक्ष उमेदवारांसाठी पदवीधर नुसार (Graduate-Standard ) घेतली जाईल व चाचणीचे स्वरुप व कठिणता स्तर (Difficulty - Level) ही माध्यम ते उच्च अशी असेल. चाचणीची तारीख सर्व अर्जदारांस स्वतंत्रपणे इमेल द्वारे कळविण्यात येईल.

ठिकाण : मुंबई .
दिनांक : २५/०५/२०१८

(sd/)
आयुक्त,
राज्य गुप्तवार्ता विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई .